# जाहिर नोटीस

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६४ मधील तरतुदी अन्वये वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील काही इमारतींना अतिधोकादायक तसेच धोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.सदर इमारतीतील रहिवाश्यांना त्यांची निवासस्थाने रिक्त करण्याकरीता महानगरपालिकेकडून वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.तथापि,काही इमारतीमध्ये अजुनही नागरीक वास्तव्यास आहेत.धोकादायक इमारतीतील नागरिकांनी त्या इमारती त्वरीत रिकाम्या करुन घेऊन निर्मनुष्य घेऊन विनाविलंब,सदर धोकादायक अतिधोकादायक इमारती स्वत:हून सुरक्षितरीत्या पाडण्याची कार्यवाही करावी.धोकादायक इमारत कोसळून काही दुर्घटना घडल्यास व त्यात जिवित व वित्त हानी झाल्यास त्याबाबतची जबाबदारी इमारतीमध्ये वास्तव्य करणा-या संबंधित नागरिकांची तसेच इमारतीचे मालक,भाडेकरु इत्यादींची राहील त्याकरीता महापालिका जबाबदार राहणार नाही,याची नोंद घ्यावी.

**वास्तव्यास असणारी इमारत,ढोबळ मानाने घोकादायक झाल्यास काही प्राथमिक लक्षणे आढळुन येतात, ती खालीलप्रमाणे**

१. इमारतीच्या आर.सी.सी. फ्रेम, कॉलम, बीम,स्लॅब इत्यादीच्या रचनेत बदल होत असल्याचे आढळल्यास उदा.
   - इमारतीचे कॉलम झुकल्यासारखे दिसुन आल्यास.
   - इमारतीचे बिम झुकल्यासारखे दिसुन आल्यास.
   - इमारतीचे स्लॅब झुकल्यासारखे दिसुन आल्यास.

२. इमारतींच्या तळमजल्याचा भाग खचल्यासारखा दियुन आल्यास

३. इमारतीच्या कॉलम मधील भेगा वाढत असल्याचे दिसुन आल्यास.

४. इमारतीच्या कॉलम मधील कॉंक्रीट पडत असल्याचे दिसुन आल्यास.

५. इमारतीच्या कॉलमचा भाग फुगल्यासारखा दिसल्यास.

६. इमारतीच्या आर.सी.सी.चेंबर्स(कॉलम,बीम) व वीटाच्या भिंती यातील सांधा/भेगा आल्यास.

७. स्लॅबचे किंवा बीमचे तळमजल्याचे कॉक्रीट पडत असल्यास.

८. इमारतीच्या गिलाव्यामध्ये (प्लास्टर) मोठया प्रमाणात भेगा असल्यास.

९. इमारतीच्या काही भागात विशिष्ट आवाज होत असल्यास.

१०. इमारतीच्या स्लॅब,बीम,कॉलमच्या भेगामुळे लोखंडी शिगा गंजल्यामुळे अशा शिगांचा आकार कमी झालेला असल्यास.

वरील लक्षणे ही प्राथमिक स्वरुपाची असुन ती उदाहरणादाखल नमुद केली असुन सर्वसमावेशक नाहीत.त्याव्यतिरिक्त देखील इमारती धोकादायक झाल्याबाबत लक्षणे असु शकतात.

अशा परिस्थितीत अशा इमारतीमध्ये वास्तव्यास असणा-या रहिवाशांनी काय काळजी घ्यावी.

१. विनाविलंब वसई विरार शहर महानगरपालिका २४x७ कार्यरत असलेल्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षात तसेच सहाय्यक आयुक्त यांना धोकादायक इमारतींची लक्षणे दिसून आल्यास संपूर्ण पत्यासह सुचना दयावी.
२. कोणताही विलंब न लावता सदर इमारत तातडीने रिकामी करावी.निर्मनुष्य करावी.
३. आजुबाजुच्या इमारतीतील रहिवाशांनासुध्दा सतर्क राहण्यास अवगत करावे.
४. तातडीने तज्ञ आर.सी.सी.तांत्रिक सल्लागार यांना दाखवुन टेकू लावण्यासंदर्भात त्वरेने कार्यवाही करावी.
५. महानगरपालिकेच्या पॅनेल वरील स्ट्रक्चर इंजिनियर बांधकाम संरचना अभियंता यांचेकडून इमारतीचे विनाविलंब स्ट्रक्चर ऑडीट करुन सहाय्यक आयुक्त यांचेकडे अहवाल प्रत सादर करावी.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांची जिवित व वित्त हानी टाळण्याच्या दृष्टिने जागरुक राहणे ही नागरिकांचीही जबाबदारी आहे.त्यामुळे आपण सर्वजण जबाबदार नागरिक म्हणुन आपआपल्या परिसरातील इमारतीवर लक्ष ठेवुन भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठी सतर्क राहून सहकार्य करावे.

अतिरिक्त आयुक्त (उ.)
वसई विरार शहर महानगरपालिका